Impact Factor
5.939 (SJIF)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

# 'नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील मुंबई'

**श्रीमती. तृप्ती राघवेंद्र सबनीस**
लेखा अधिकारी
मा. पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई
मा. गुरुनानक खालसा महाविद्यालय, माटुंगा
(पूर्व), मुंबई.
ई मेल- truptisabnis2201@gmail.com

Crossref DOI –

---

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यात विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विद्रोही कवितेची एक नवी लाट निर्माण झाली. या लाटेचे सर्वात प्रभावी आणि धारदार नाव म्हणजे नामदेव ढसाळ. त्यांनी मराठी कवितेला केवळ नवा आशय दिला नाही, तर नव्या भाषेचे, नव्या प्रतिमांचे आणि नव्या सामाजिक जाणिवांचे विश्व दिले. त्यांच्या कवितेत 'मुंबई' ही केवळ एक शहररचना नसून ती शोषण, विषमता, वंचना, संघर्ष, लैंगिकता, दलित अनुभव आणि विद्रोह यांचे प्रतीक बनून उभी राहते. ढसाळ यांच्या कवितेतील मुंबई ही स्वप्नांची नगरी नाही; ती दुःख, भूक, दलदलीतले जीवन, वेश्यावस्ती, फुटपाथ, झोपडपट्टी आणि उपेक्षितांच्या अस्तित्वाची नगरी आहे. त्यांच्या कवितेतून मुंबईचे जे चित्र उभे राहते, ते मुख्य प्रवाहातील साहित्याने जाणीवपूर्वक टाळलेल्या वास्तवाचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे ढसाळ यांच्या कवितेतील मुंबई केवळ साहित्यिक नसून सामाजिक आणि सांस्कृतिकही आहे.

**नामदेव ढसाळ : व्यक्तिमत्त्व आणि साहित्यदृष्टी :**

नामदेव ढसाळ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९४९ रोजी पुणे जिल्ह्यातील पुर-कान्हेरसर येथे झाला. बालपणीच ते मुंबईत आले. मुंबईतील कामाठीपुरा, गोलपीठा, वेश्यावस्त्या, झोपडपट्ट्या आणि रस्त्यावरचे जीवन त्यांनी जवळून अनुभवले. हाच अनुभव त्यांच्या कवितेचा गाभा ठरला. त्यांनी दलित पँथर चळवळीची स्थापना करून सामाजिक आणि सांस्कृतिक विद्रोहाला साहित्यिक रूप दिले. त्यांचा 'गोलपीठा' (१९७२) हा कवितासंग्रह मराठी साहित्यातील क्रांतिकारी घटना मानला जातो. या संग्रहाने मराठी कवितेच्या आशयविश्वाला नवे वळण दिले. विजय तेंडुलकर यांनी 'गोलपीठा'च्या प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे, ''पांढरपेशा जग संपते आणि जिथे "नो मॅन्स लँड" सुरू होते, तिथून ढसाळ यांच्या कवितेचे जग सुरू होते.'' नामदेव ढसाळ यांची कविता महानगरी संवेदनेच्या अनेक गृहीत तत्त्वांचा भेद करणारी कविता आहे. महानगरी माणसाचा सार्वत्रिक पेच बाजूला करून ती महानगरातील बहिष्कृत आणि गलिच्छ वस्तीतील दैन्य दारिद्र्याचे आणि तिच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचे चित्रण करण्यावर आपले लक्ष केंद्रित करताना दिसते. जनसामान्यांचे प्रश्न घेऊन उठवणारी आणि परिवर्तनाला शब्दबद्ध करणारी ही कविता आहे. प्रस्थापित राजकीय आणि सामाजिक व्यवस्था पूर्णपणे उध्वस्त करून पूर्णतः नवीन व्यवस्था प्रस्थापित करणे हे तिचे लक्ष्य आहे.

**ढसाळ यांच्या कवितेतील मुंबईचे स्वरूप :**

**१. उपेक्षितांची मुंबई :**

ढसाळ यांच्या कवितेतील मुंबई ही उच्चभ्रू लोकांची, उंच इमारतींची किंवा स्वप्नपूर्तीची नगरी नाही. ती तळागाळातील लोकांची मुंबई आहे. त्यांच्या कवितेत रस्त्यावरचा माणूस, वेश्या, भिकारी, दलित, कामगार आणि भुकेले लोक दिसतात. 'गोलपीठा' या संग्रहातील कविता मुंबईच्या त्या भागाचे प्रतिनिधित्व करतात, ज्याला सभ्य समाजाने कायम नाकारले. या कवितांमध्ये शहराच्या मागील गल्लीबोळातील अंधार दिसतो. वेश्यावस्तीतील स्त्रियांचे दुःख, त्यांचे शोषण, त्यांची मानवी वेदना आणि त्यांच्यातील जिवंतपणा ढसाळ यांनी अत्यंत वास्तववादी शैलीत मांडला आहे. मुंबईतील वंचितांचे जीवन त्यांच्या कवितेत इतक्या प्रखरतेने येते की वाचक अस्वस्थ होतो. ही अस्वस्थता हेच त्यांच्या कवितेचे यश आहे.

**२. मुंबई : विद्रोहाचे प्रतीक :**

ढसाळ यांच्या कवितेतील मुंबई विद्रोहाची भूमी आहे. शहरातील विषमता, जातीयता, वर्गसंघर्ष आणि आर्थिक अन्याय यांच्या विरोधात त्यांचा शब्द आक्रोश करतो. त्यांच्या कवितेत वापरलेली भाषा ही पारंपरिक काव्यभाषा नाही. त्यांनी शिव्या, गलिच्छ मानले जाणारे शब्द, रस्त्यावरील बोलीभाषा आणि लोकजीवनातील प्रतिमा यांचा निर्भीड वापर केला. त्यामुळे त्यांची कविता 'सभ्यतेच्या चौकटीबाहेरची कविता' म्हणून ओळखली जाते. परंतु या शब्दांमागे समाजातील अन्यायाविरुद्धचा संताप आहे. मुंबई त्यांच्या कवितेत शोषण करणारी आणि शोषितांना गिळणारी व्यवस्था बनून उभी राहते. ही मुंबई कधी वेश्या बनते, कधी राक्षसी शहर बनते, तर कधी विद्रोहाच्या ज्वालामुखीचे रूप धारण करते.

**३. "मुंबई मुंबई माझ्या प्रिय रांडे" : मुंबई महानगराचे प्रतीकात्मक चित्रण :**

ढसाळ यांची "मुंबई मुंबई माझ्या प्रिय रांडे" ही कविता विशेष चर्चेत राहिली. या कवितेत त्यांनी मुंबईला 'प्रिय रांडे' अशी उपमा दिली आहे. पहिल्या दृष्टीक्षेपात ही उपमा धक्कादायक वाटते; परंतु तिच्यामागे शहराच्या दुटप्पी स्वरूपाचे चित्रण आहे. मुंबई ही लाखो लोकांना आकर्षित करणारी आहे, पण त्याचवेळी त्यांचे शोषण करणारीही आहे. ती माणसांना जगण्याची संधी देते, पण त्यांच्याकडून माणुसकी हिरावून घेते. या कवितेत लैंगिक प्रतिमांचा वापर करून ढसाळ यांनी शहराच्या भोगवादी स्वरूपावर भाष्य केले आहे. या कवितेतील भाषा ही पारंपरिक सौंदर्यदृष्टी मोडून काढणारी आहे. "४ वेद, १८ पुराणं, ६ शास्त्र मी मारतो..." अशा ओळींमधून ते पारंपरिक मूल्यव्यवस्थेलाच आव्हान देतात.

**४. दलित अनुभव आणि मुंबई :**

ढसाळ यांच्या कवितेतील मुंबई दलित अनुभवांशिवाय समजणे अशक्य आहे. मुंबईत आलेल्या दलित समाजाने शहरात कामगार, हमाल, टॅक्सीचालक, मजूर म्हणून जीवन जगले. पण त्यांना समानता मिळाली नाही. ढसाळ यांच्या कवितेत दलितांचे दुःख हे केवळ भावनिक स्वरूपात नाही, तर राजकीय जाणिवेतून येते. त्यांच्या कवितेतील विद्रोह हा सामाजिक क्रांतीचा भाग आहे. दलितांच्या दैन्याचे वर्णन करताना ते दया मागत नाहीत; ते अन्यायाविरुद्ध लढा उभा करतात. मुंबई त्यांच्या कवितेत दलितांच्या संघर्षाचे रणांगण बनते. ही कविता आंबेडकरी

विचारांशी जोडलेली आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत विद्रोह आणि मानवतावाद यांचा संगम दिसतो.

**५. स्त्रीप्रतिमा आणि महानगरीय वास्तव :**

ढसाळ यांच्या कवितेत स्त्री ही केवळ सौंदर्याचे प्रतीक नाही. ती शोषित आहे, दलित आहे, वेश्या आहे, जगण्यासाठी झगडणारी आहे.‘मंदा’सारख्या कवितांमध्ये त्यांनी वेश्यावस्तीतील स्त्रीचे मानवी रूप उभे केले. तिच्या वेदना, तिची घुसमट, तिची स्वातंत्र्याची आकांक्षा अत्यंत संवेदनशीलतेने त्यांनी मांडली आहे. मुंबईतील स्त्रियांचे जीवन ढसाळ यांच्या कवितेतून नग्न वास्तवासह समोर येते. त्यांनी स्त्रीचे रोमँटिक चित्रण न करता तिच्या अस्तित्वाच्या संघर्षाला शब्द दिले.

**६. भाषाशैली आणि प्रतिमासृष्टी :**

ढसाळ यांच्या कवितेची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची भाषाशैली. त्यांनी मराठी कवितेला नवे शब्द, नवी प्रतिमा आणि नवी अभिव्यक्ती दिली. त्यांच्या कवितेत रस्त्यावरची भाषा, बोलीभाषा, शिव्या, लैंगिक प्रतिमा आणि हिंस्र वास्तव यांचा वापर आहे. त्यामुळे त्यांची कविता अनेकांना अश्लील वाटली. परंतु ही भाषा समाजातील घाणेरड्या वास्तवाचे प्रतिबिंब आहे. ढसाळांनी त्यांच्या कवितेत शिव्या, म्हणी, उखाणे, लोकगीते इत्यादी गोष्टींचा रेलचेल वापर केलेला दिसून येतो. त्यांनी शिष्टसंमत भाषेला छेद देऊन अश्लील व विभत्स वाटावी पण दैनंदिन जीवनातील बोलीभाषा निवडल्याचे दिसून येते. नामदेव ढसाळ यांच्या ‘गोलपिठा’ या काव्यसंग्रहात महानगरातील अधोलोकांचे विश्व प्रकट होताना दिसते. या विश्वातील संवेदन मांडण्यासाठी ढसाळांच्या विविधांगी शब्दांचा वेध घेतलेला दिसून येतो. इराकत, डिंग्या, डेंग, संदल, हेपलून, लेंडकं, उटपटांग, रांड, अशा खास प्रादेशिक शब्दांचा वापर त्यांनी कवितेत केलेला दिसून येतो. सियासत, हमदर्दी, संदल, जिक्र, सौदागर, कफन, कव्हर, मादरी, जुबान, दफन अशा काही उर्दू-फारसी भाषेतील शब्दांना देखील त्यांनी कवितेत स्थान दिलेले दिसून येते. ख्रिस्ताविषयी ढसाळ यांना विशेष आपुलकी वाटते म्हणून ते मेरी, ख्रिस्त, क्रूस, अशा अनेक प्रतिमांचा गौरवपूर्ण उल्लेख करताना दिसतात. त्यांनी काही कवितेत इंग्रजी शब्दांचा मराठीच्या अंगाने केलेला वापर अधिक लक्षणीय आहे. फॉस्फरस संध्याकाळ, लीक झालेला सूर्य, लिक्विड यातना, फ्युज उडालेला माणूस, व्हर्जिन भाषा, व्हीनस कमळ अशी काही विशेष उदाहरणे देता येतील.

ढसाळ त्यांच्या कवितेत निसर्ग, प्रेम, स्त्री याविषयीच्या रोमँटिक कल्पनांना कशाप्रकारे नाकारतात हे दिसून येते. उदा. 'माझ्या लाडक्या एकुलत्या एक कळया- सावळया मादीस' (मूर्ख म्हातारा...) 'आश्चर्यचकिताचा बूट मी घालू काय माझ्या पायात' (गांडू बगीचा) 'या अनुभवानं असं मला काट्याकुट्यातून हिंडवल आहे. (या सत्तेत..) 'मी ठोकून बसलोय मांड त्यावर (या सत्तेत) 'ठोकर होकर लेकुरवाळा छळ श्लीलतेच देवगुणी' (गो..) इत्यादी. मुंबईच्या गल्लीबोळातील जीवन त्यांनी ज्या प्रतिमांतून व्यक्त केले, त्याचे वास्तव त्यांनी कवितेतून चित्रीत केल्याचे आढळते. नामदेव ढसाळ यांनी त्यांच्या कवितेत वारंवार विशेषणांचा वापर केल्याचे दिसून येते. उदा.'राक्षसी चुंबन', 'छबुकलं दारिद्र्य', 'थुईथुई काळोख', 'बासमती गंध' 'फॉस्फरस संध्याकाळ', 'छिनाल पौर्णिमा', 'लोफर मेलडी', 'सूचीपर्णी गोधडी', 'किनखापी चोच', 'महारोग्यासारख्या सांडलेल्या झोपड्या', 'ऑब्जेक्टिव्ह प्रेक्षक' 'बुडबुड्यांची भानामती', 'पिळवणुकीचा पिंजरा' अशा प्रकारच्या विशेषणांची उधळण त्यांनी कवितेत केल्याचे दिसून येते. ढसाळांच्या कवितेत भाषेतील नियमोल्लंघन वारंवार घडून आल्याचे दिसून येते. त्यांच्या कवितेत शब्दांच्या मूळ

रूपात बदल केल्याचे आढळून येते. प्रार्थळतो, दारुळते, पैंजणत, स्वच्छवतो इत्यादी तर कधी, माणसं, हिर्वळ, कन्वट, मख्मली, कुर्वाळणे असे उच्चारानुसार लेखन केल्याचे दिसून येते. काही कवितेत त्यांनी मूळच्या इंग्रजी शब्दांच्या ओळीही मराठीत उच्चारानुसार लिहिल्याचे आढळते '

'ओ माय लव्ह,

ओ, माय हार्ट

डोन्ट बि सिली

डोन्ट हर्ट मी.'

(शुभदे तुझे नाव व्हीनस/खेळ-४८)

ढसाळानीं नव-नवीन शब्दरचना करून, प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा प्रक्षोभ कवितेतून प्रकट केल्याचे दिसून येते.

**७. मुंबई : मानवी अस्तित्वाचा प्रश्न :**

ढसाळ यांच्या कवितेत मुंबई हा केवळ भौगोलिक प्रदेश नाही. ती मानवी अस्तित्वाचा प्रश्न बनते. शहरातील माणूस एकटा पडलेला आहे. त्याच्याकडे स्वप्ने आहेत, पण त्याच्याकडे जगण्यासाठी साधने नाहीत. त्यांच्या कवितेत शहरातील माणसाची तगमग, लैंगिकता, हिंसा, उपासमार आणि मानसिक ताण अत्यंत प्रभावीपणे व्यक्त होतो. त्यामुळे त्यांच्या कवितेतील मुंबई ही आधुनिक नागरी संस्कृतीवरील भाष्य ठरते.

**निष्कर्ष :**

नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील मुंबई ही केवळ भौगोलिक अथवा महानगरीय अवकाशाची प्रतिमा नसून सामाजिक विषमता, जातीय शोषण, आर्थिक अन्याय आणि मानवी अस्तित्वाच्या संघर्षाचे बहुआयामी प्रतीक आहे. त्यांनी मुंबईच्या झगमगाटामागील उपेक्षित, दलित, कामगार, वेश्यावस्तीतील स्त्रिया आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिलेल्या घटकांचे वास्तव अत्यंत प्रखरतेने शब्दबद्ध केल्याचे दिसून येते. त्यांच्या कवितेतून मुंबईचे असे रूप समोर येते, जे मुख्य प्रवाहातील साहित्याने दीर्घकाळ दुर्लक्षित ठेवले होते.

ढसाळ यांच्या कवितेने मराठी साहित्याला नवा आशय, नवी भाषा आणि नवी सामाजिक जाणीव दिली. त्यांच्या काव्यदृष्टीत विद्रोह, मानवतावाद आणि आंबेडकरी विचार यांचा प्रभावी संगम दिसून येतो. त्यांनी पारंपरिक काव्यभाषा, मूल्यव्यवस्था आणि सौंदर्यदृष्टी यांना आव्हान देत नव्या भाषिक व अभिव्यक्तीपर परंपरेची निर्मिती केल्याचे आढळते. त्यांच्या कवितेतील भाषेची धार, प्रतिमांची तीव्रता आणि वास्तवाचे निर्भीड चित्रण यांमुळे मराठी कवितेला नवे आशयविश्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

Research Hub International Journal

अशा प्रकारे, नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील मुंबई ही केवळ एका शहराची कथा नसून आधुनिक भारतीय समाजव्यवस्थेतील विषमता, संघर्ष आणि परिवर्तनाच्या आकांक्षेचे सशक्त दस्तऐवजीकरण आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेचा अभ्यास हा मुंबईच्या सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाचा, दलित साहित्याच्या विद्रोही परंपरेचा आणि आधुनिक मराठी कवितेच्या परिवर्तनशील प्रवासाचा अभ्यास ठरतो.

**संदर्भग्रंथ सूची :**

- ढसाळ, नामदेव — गोलपीठा, प्रास प्रकाशन, मुंबई.
- ढसाळ, नामदेव — खेळ, प्रास प्रकाशन, मुंबई.
- ढसाळ, नामदेव — मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले.
- ढसाळ, नामदेव — गांडू बगीचा.
- ढसाळ, नामदेव — मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे.
- तेंडुलकर, विजय — गोलपीठा प्रस्तावना.
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ — समग्र नामदेव ढसाळ.
- केजकर देशपांडे प्रकाश- 'मराठी कविता नवी वळणे' साकेत प्रकाशन प्र.आ. १९९४

Research Hub International Journal